| MHRG100001782026 | दाखल दिनांक : ०६/०३/२०२६ |
|---|---|
| | नोंदणी दिनांक : ०६/०३/२०२६ |
| | निकाल दिनांक : १४/०३/२०२६ |
| | कालावधी : ०० वर्ष ०० महिने ०८ दिवस |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड, यांच्या न्यायालयात**
**{ पीठासीन अधिकारी श्रीमती पी. एस. माळी }**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९६/२०२६**
**निशाणी : ४**

| | | |
|---|---|---|
| १) | अपराध घडल्याचा दिनांक | : २४/०२/२०२६ |
| २) | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : २४/०२/२०२६ |
| ३) | फिर्यादीचे नांव, त्याच्या आई व वडीलांचे नांव, त्याचे वय व त्याचे निवासस्थान, इ. | : महाराष्ट्र शासन (व्दारा : पोलादपुर पोलीस ठाणे) |
| ४) | आरोपीचे नांव, आरोपीच्या आई व वडीलांचे नांव, त्याचे वय व त्याचे निवासस्थान, इ. | : आदेश आगेश गायकवाड, वय : ३५ वर्ष,धंदा : चालक, रा. सैनिक नगर, पोलादपुर, ता. पोलादपुर, जि. रायगड |
| ५) | ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील | : |

दिनांक २४/०२/२०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजताचे सुमारास छत्रपती शिवाजी महाराज रोड चौकवर सार्वजनिक रस्त्यावर आरोपी याने त्याचे ताब्यातील पानाची हातगाडी ही उभी करून प्रचंड प्रमाणात गर्दी करून रहदारीस अडथळा व अटकाव निर्माण केला, तसेच सार्वजनिक रहदारीस धोका निर्माण होईल अशा स्थितीत त्याचे ताब्यातील वाहन मिळुन आले, म्हणुन त्याच्यावर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८५ प्रमाणे या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रामध्ये गुन्हा केल्याचा दोषारोप

आहे.

PUJA SANKET MALI
Digitally signed by PUJA SANKET MALI
Date: 2026.03.14 14:15:27 +0530

**महाड.** **( पी. एस. माळी )**
**दिनांक : १४/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग, महाड.**

प्रश्न १) : तुम्हाला पोलीस टिपणाच्या नकला मिळाल्या का ?

उत्तर : होय.

प्रश्न २) : तुमच्यावर ठेवलेला दोषारोप तुम्हाला वाचून दाखविला व समजावून सांगितला तो तुम्हाला समजला का ?

उत्तर : होय.

प्रश्न ३) : तुम्हाला गुन्हा कबूल आहे का ?

उत्तर : होय. मला गुन्हा कबूल आहे.

.....................

**(आरोपीची सही)**

**समक्ष**

PUJA SANKET MALI
Digitally signed by PUJA SANKET MALI
Date: 2026.03.14 14:15:31 +0530

**महाड.** **(पी. एस. माळी)**
**दिनांक : १४/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग, महाड.**

## न्यायनिर्णय

दिनांक २४/०२/२०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजताचे सुमारास छत्रपती शिवाजी महाराज रोड चौकवर सार्वजनिक रस्त्यावर आरोपी याने त्याचे ताब्यातील पानाची हातगाडी ही उभी करून प्रचंड प्रमाणात गर्दी करून रहदारीस अडथळा व अटकाव निर्माण केला, तसेच सार्वजनिक रहदारीस धोका निर्माण होईल अशा स्थितीत त्याचे ताब्यातील वाहन मिळुन आले. आरोपीने सदर गुन्हयाची कबूली दिली असून, पुरशिस निशाणी क्र. २ अन्वये दाखल केली आहे. तसेच आरोपी याने त्याचे आधारकार्डाची पडताळीत प्रत निशाणी क्र. ३ अन्वये दाखल केली आहे.

सदर पुरशिसवरून त्यांची गुन्हा कबुलीची पडताळणी करणेत आलेली आहे. सदरचा गुन्हा हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. तसेच सदर गुन्हा त्याच्याकडून अनवधानाने झालेला आहे असे कथन केले. तसेच त्याने यापुढे सुधारण्याची इच्छा व्यक्त केली. आरोपीने पुढे असे कथन केले तो घरातील एकमेव कर्ता पुरूष असून, घरातील इतर व्यक्ति त्याच्यावर अवलंबून आहेत. त्यामुळे त्यास कमीत कमी शिक्षा द्यावी अशी विनंती केली आहे.

आरोपी व सहाय्यक सरकारी वकील याचे म्हणणे ऐकले. गुन्हयाचे स्वरूप व सदर गुन्हयास असलेली शिक्षेची तरतूद व आरोपीचा कबुली जबाब व शिक्षा कमी देणेबाबत दिलेले म्हणणे विचारात घेतले असता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी नामे आदेश आगेश गायकवाड यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ या गुन्हयाकरीता दंड रक्कम रूपये १०००/— अशी शिक्षा देण्यात येत आहे. आरोपीने दंड न भरल्यास त्याने १५ दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा भोगावयाची आहे.

PUJA SANKET MALI

Digitally signed by PUJA SANKET MALI
Date: 2026.03.14 14:15:36 +0530

**महाड.** **( पी. एस. माळी )**
**दिनांक : १४/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग, महाड.**